# पुरस्काराने व्यवसायवाढीची उमेद मिळाली - वनिता पिसे



सकाळ वृत्तसेवा

नवी दिल्ली, ता. १८ - ""आदर्श स्त्री पुरस्कारामुळे मला आजवर मी करीत आलेल्या व्यवसायात वाढ करण्याची उमेद आणि आत्मविश्वास वाढला आहे. आता हा व्यवसाय चालता राहावा आणि आमच्या मालाला उठाव मिळावा," अशी इच्छा वनिता जालिंदर पिसे यांनी आज व्यक्त केली. .......
....... पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार मिळाल्याचा आनंद सौ. पिसे यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील माणदेशी महिला सहकारी बॅंकेच्या बचत गट फेडरेशनच्या संघटक या नात्याने त्या गरजू महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी बॅंकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी मदत करतात.

सहावीपर्यंत शिक्षण झालेल्या सौ. पिसे यांचा म्हसवडमध्ये कुक्कुटपालनाचा व्यवसाय होता. परंतु परिस्थितीमुळे गाई-म्हशी पाळण्याची वेळ आली. घरोघरी जाऊन दूध विक्री करतानाच त्यांनी इतर महिलांना शेळ्या-म्हशी खरेदीसाठी व दुधाच्या व्यवसायासाठी माणदेशी महिला सहकारी बॅंकेकडून कर्ज मिळवून दिले. २००१ पासून त्या ३५ बचत गटांचे काम करीत आहेत. स्त्रियांना व्यवसाय सुरू करण्यासाठी, गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी त्या कर्ज मिळवून देतात. आजवर सुमारे सातशे गरजू स्त्रियांनी ही कर्जे घेतली असून, आर्थिकदृष्ट्या त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत.

Print Email Back